*Purakala*
**(UGC Care Journal)**

**ISSN:0971-2143**
**Vol-31-Issue-09-April-2020**

# मराठेकालीन कसबा

प्रा.राजगुरू गौतम धनाजी
इतिहास विभाग ,दादा पाटील महाविद्यालय,
कर्जत, अहमदनगर.
gtmrajguru@gmail.com

**सारांश–**सदर लेखात १७ व्या व १८ व्या शतकातील मराठेकालीन सामाजिक,प्रशासकीय व आर्थिक जीवनातील महत्वपूर्ण अशा 'कस्बा' या घटकाचा आढावा घेतलेला आहे. यात कस्बा या शब्दाचा अर्थ उदय तसेच कसब्याच्या स्थापनेला अनुकूल घटक. मराठेकालीन महत्वपूर्ण कस्बे यांचा मागोवा घेतलेला आहे. कसब्याची रचना, कसब्यातील सामाजिक जीवन, कसब्यातील प्रशासकीय अधिकारी,बलुतेदार,अलुतेदार इ.चाआढावा घेतलेला आहे.तसेच कसब्याचे आर्थिक महत्व व कसब्यात चालणारे उदयोग-व्यवसाय यात समावेश असलेल्या जाती-जमाती यांचा अभ्यास करण्यात अलेले आहे. मराठेकालीन कस्बा आणि मुघलकालीन कस्बा यांचा तुलनात्मक अभ्यास केलेला आहे;

## प्रास्ताविक

प्राचीन काळापासून भारताच्या आर्थिक जीवनात कसबा या घटकाला महत्त्वपूर्ण स्थान असलेले आपणास दिसून येते.तसेच मध्य युगीन महाराष्ट्राच्या सामाजिक,राजकीय व आर्थिक जीवनामध्ये कसबा या घटकाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त आलेले दिसून येते.कसबा हा घटक ग्राम आणि नगर या दरम्यानचा घटक आहे.

मराठे काळात शेती व्यवसायाबरोबरच शेतीपूरक उद्योगधंदये विविध व्यवसाय, हस्तकला, कुटिरोद्योग,व्यापार उदीम हे सर्व कसब्यात चालत. मराठेकालीन सर्व आर्थिक व्यवहार हे लोक जीवनातील नानाविध गरजा खेडी,कसबा व नगर येथे चालत. विविध व्यवसाय उद्योग-व्यापार करण्याच्या निमित्ताने वाढत गेलेली खेडी म्हणजेच 'कसबा' होय.

## अर्थ

कसबा हा अरेबिक शब्द 'कस्ब' या शब्दापासून निर्माण झालेला आहे. कस्ब या शब्दाचा अर्थ कला, कौशल्य असा होतो. यातून ज्या ठिकाणी कसबी लोकांची वस्ती त्याला कसबा असे म्हणत. खेडे व नगर या दरम्यानच्या घटकाला कसबा म्हटले जाते.


Copyright © 2020Authors
CamScanner

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

ज्या ठिकाणी शेती कसणारा वर्ग बहुसंख्य असतो त्याला ग्राम किंवा खेडे म्हटले जाते आणि जर खेड्यात किंवा ग्रामात कसबी लोकांची वस्ती अधिक असेल तर त्या ग्रामाला कसबा असे म्हणतात. कसब्यात कारागीर, व्यापारी, व्यावसायिक यांची वस्ती अधिक असते तसेच या ग्रामच्या ठिकाणी बाजारपेठ असते. आर्थिक व्यवहार व आकारमान या नुसार कसबा हा ग्रामापेक्षा मोठा व नगरापेक्षा लहान असतो. कायमस्वरूपी बाजारपेठ हे कसब्याचे प्रमुख वैशिष्टे असते.

## उदय

महाराष्ट्रात कसबा हा घटक हा प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला दिसून येतो.परंतु या घटकाला विस्तारित रूप हे मुस्लीम राजवट स्थापन झाल्यानंतर प्राप्त झालेले आपणास दिसून येते. निजामशाही व आदिलशाही कागदपत्रांमध्ये कासब्यांचे उल्लेख येतात. निजामशाही, आदिलशाही व  मराठेकाळात कसबा हे अंतर्गत व्यापार उदिमाचे केंद्र होते. मराठेकाळात पुणे, सुपे, ओतूर, शिरवळ ,चाकण, खेड, संगमनेर, कऱ्हाड, सासवड इ. महत्त्वाचे कसबे होते.या कासब्यांचे उल्लेख तत्कालीन कागदपत्रांमध्ये येतात.

मराठेकालीन कसब्यांच्या स्थापनेला व वाढीला अनेक घटक सहाय्यभूत ठरलेले दिसतात, ते खालीलप्रमाणे,

१. भौगोलिक स्थान
२. नैसर्गिक संसाधनाची उपलब्धता
३. व्यापारी मार्गावरील स्थान
४. सुरक्षितता
५. उद्योगधंद्याचे केंद्र

## कसब्याचे स्वरूप

कसबा या घटकाची रचना हि ग्राम व नगर याचे मिश्रण आपणास दिसून येते,रचनेचा विचार करता कसब्याचे २ ठळक भाग आपणास दिसून येतात १. मुंजेरी  २.पेठ हे भाग परस्परांपासून वेगळे असलेले दिसून येतात.

**१. मुंजेरी-** कसब्यातील ज्या भागात शेतकऱ्यांची वस्ती असे त्या भागाला मुंजेरी असे म्हणतात. येथील कारभार हा ग्रामाप्रमाणे चालतो. मुंजेरीत पाटील, कुलकर्णी, चौगुला या वतनदारांना महत्व असते तसेच त्यांना १२ बलुतेदार सहाय्य करतात.

**२. पेठ -** कसब्यात विविध कसबी कारागीर, व्यावसायिक, व्यापारी, वाणी-उदमी यांची जेथे वस्ती असते त्या भागाला पेठ असे म्हणतात. पेठेचा कारभार हा शेटे, महाजन, यांच्या मार्फत चालत. पेठ हा कसब्यातील सर्वात महत्त्वाचा विभाग होय.पेठ हेच विविध स्वरूपाच्या आर्थिक व्यवहारांचे ठिकाण होते. पेठांना विशिष्ट असी नवे दिलेली दिसून येतात, उदा. बहिरव पेठ - पाबळ कसब्यातील, पादशहापुर- बारामती कसब्यातील इ. एखाद्या कसब्यात एकापेक्षा अधिक पेठा असल्याच्या दिसून येतात.

पेठेतील कारागीर- व्यापारी यांना सरकारला जकात, व्यवसायकर द्यावा लागत असे. पेठेत मागील वर्षाची बाकी ठेवण्याची मुभा सरकार देत असे व चालू वर्षाचा कर घेतला जात. पेठेची भरभराटीवरून राज्याची आर्थिक स्थितीचा अंदाज येत असे.त्यामुळे पेठेचे वतनदार, सरकारी अधिकारी पेठेकडे विशेष लक्ष देत असत. पेठेत १८ अलुतेदार असत जसेकी, सुतार, कुंभार, रंगारी, तेली, तांबोळी, जिनगर, हलवाई, बागवान, गवंडी, कलाल, इ. सारखी कसबी कारागीर व विविध


Copyright © 2020Authors
CamScanner

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

व्यावसायिक असत, यांची संख्या प्रत्येक कसब्यातील पेठेतील वेगवेगळी असते.पेठेतील विविध व्यावसायिकांना 'खुम' मनात.

१८व्य शतकात कसब्याची मुंजेरी व पेठा अशीच रचना कायम राहिली,परंतु त्यांच्या प्रशासनात बदल झालेला दिसतो. कमाविसदार या पेशव्यांनी नेमलेल्या अधिकाऱ्याकडे मुंजेरी व पेठ या विभागाच्या प्रशासनाची जबाबदारी सोपविण्यात आली.

## पेठेतील कुटिरोधोग

मध्ययुगीन भारतात तसेच मराठे काळात कसब्यात अनेक प्रकारचे कुटिरोधोग चालत असत. या उद्योगाच्या माध्यमातून राज्य काही प्रमाणात स्वयंपूर्ण झालेली दिसून येते. यात पुढील उद्योगांचा समावेश होत असे,

**अ) शेती उत्पादनाशी निगडीत उद्योग-** शेती उत्पादनावर निगडीत उद्योगांमध्ये तेल उद्योग, वस्त्र उद्योग, गुळ उद्योग, मधार्क उद्योग इ. उद्योगांचा समावेश होतो.

**१. तेल उद्योग -** तेल उद्योग हा अश्या कसब्यात असे जेथे तेल तयार करण्यासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचा पुरवठा मुबलक असे. कच्च्या मालामध्ये भुईमुग, सुर्यफुल, तीळ, मोहरी, करडई इ. पिकांच्या उत्पादनाच्या प्रदेशात असत. उदा. कसबे आंबेगाव, कसबे माळुंगे, कसबे लोहगाव इ.

**२. वस्त्र उद्योग-** वस्त्र उद्योग हा तत्कालीन मराठेशाहीतील महत्त्वपूर्ण उद्योग असल्याचे दिसते, या उद्योगात पंजेरी, साळी, कोष्टी, मोमीन, रंगारी इ. उपजाती गुंतलेल्या होत्या.वस्त्र उद्योग कसबे सासवड मध्ये भरभराटीस आल्याचे दिसून येतो.

सणगर हि जात लोकरीचे वस्त्र बनवत असत,लोकरीच्या वस्त्रासाठी कसबे इंदापूर प्रसिध्द होते.

**३. सिमेंट उद्योग -** मराठे काळात महत्त्वपूर्ण उद्योग होता. सिमेंटचा उपयोग बांधकामासाठी केला जात जात. लोणारी हि जमात या उद्योगात प्राविण्य मिळवले होते. चुनकळी व गुळाच्या मिश्रणाच्या माध्यमातून सिमेंट बनवत.

**ब) शेती उत्पादनांव्यतिरिक्त उद्योग -** मराठे काळात शेती उत्पादनांव्यतिरिक्त काही महत्त्वपूर्ण उद्योग भरभराटीस आल्याचे दिसून येते, यात सुगंधीद्रव्य उद्योग, धातुकाम उद्योग, कातडी उद्योग इ. उद्योगांचा समावेश होतो.

**१. धातुकाम उद्योग-** मराठेकालीन सर्वात महत्त्वाचा कुटिरोद्योग होता.या उधोगामध्ये सोन्या-चांदीचे दागिने, लोखंड, तांबे, पितळ इ. धातूंपासून दैनंदिन वापराच्या वस्तू तसेच शेतीसाठी आवश्यक अवजारे तयार केली जात.

**२. चर्म उद्योग-** कसब्यात कातडीपासून विविध प्रकारच्या वस्तू बनविण्याचा कुटिरोद्योग हा चालत असे, यात खोगीर तयार करणे, चपला तयार करणे, मोट तयार करणे इ. उद्योगांचा समावेश होत असे.

**क) वाणी-** कसब्यात अन्न-धान्य ची मुलभूत गरज वाणी भागवत असत त्यामुळे वाणी हा पेठेचा अविभाज्य घटक होता. इतर व्यावसायिकांपेक्षा वाण्याची दुकाने पेठेत संख्येनेअधिक होती. वाण्याच्या दुकानांच्या संख्येवरून कसब्याच्या आकाराचा अंदाज करता येत असत.

मराठेकालीन कसबा आणि उत्तर भारतातील कसबा यांची तुलना करता असे दिसून येते कि,बाजारपेठ हे सर्वच प्रदेशातील कसब्याचे मुलभूत वैशिष्ट्य दिसते. व्यवसायांचे वैविध्य,आर्थिक व्यवहारांची विविधता हेही सर्वच प्रदेशातील कसब्यात आढळते. मराठेकालीन महाराष्ट्रातील कसब्यांची संख्या हि राजस्थान, गुजरात, हरियाणा या प्रदेशातील कसब्यापेक्षा कमी होती. महाराष्ट्रातील कसबे हे आकारमानाने लहान होते.


Copyright © 2020Authors
CamScanner

ISSN:0971-2143
Vol-31-Issue-09-April-2020

## समारोप

एकूणच १७व्या शतकात महाराष्ट्रात मोठ्या व्यापारी पेठा,शहरे हि संख्येने कमी असल्यामुळे बहुतांश आर्थिक व्यवहार हे कसब्यातून चालत होते. १८ व्या शतकात मराठी सत्तेच्या विस्तारामुळे कसब्यांची संख्या वाढली, तर काही कसब्यांचे आर्थिक व्यवहार व्यापक बनले व त्यांचे रुपांतर नगरात झाले. पुणे हे त्याचे उत्तम उदाहरण होय. नगर निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये कसबा हा महत्त्वाचा टप्पा होता. एकंदरीतच मराठे काळात कसबा हे आर्थिक व प्रशासकीय व्यवहाराचे महत्वाचे केंद्र असल्याचे आपणास दिसून येते. मराठ्यांच्या राज्याच्या अस्तानंतर महाराष्ट्रात ब्रिटीश राजवटीमध्ये अर्थव्यवस्थेची घडी बदलायला लागली व गावगाड्याचे अस्तित्व काही बदलांबरोबर सातत्याने राहिले परंतु कसब्याचे महत्त्व काही प्रमाणात कमी झालेले दिसून येते.

## संदर्भ ग्रंथ

१.अत्रे त्रिं.ना.,गावगाडा,वरदा प्रकाशन,पुणे.

२.कठारे अनिल, कदम वसंत,मराठे कालीन समाज, गुन्हे, दंड आणि शिक्षा, सुगावा प्रकाशन,पुणे,२०००.

३.कुलकर्णी अ.रा.,शिवकालीन महाराष्ट्र,राजहंसप्रकाशन,पुणे,१९९३.

४.चिटणीस के.एन.,मराठेकालीनसामाजिकआणिआर्थिकइतिहास,कॉन्टिनेन्टलप्रकाशन,पुणे.

५.जोशी लक्ष्मणशास्त्री, मराठी विश्वकोश,महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ,मुंबई.

६.जोशी एस.एन.,मराठेकालीन समाजदर्शन,वरदाप्रकाशन,पुणे.

७.भावे वा.कृ,शिवकालीन महाराष्ट्र,वरदाप्रकाशन,पुणे.

८.भावे वा.कृ.,पेशवेकालीन महाराष्ट्र,वरदा प्रकाशन,पुणे.

९.Kulkarni M. G., Indian Social System, Primal Publications, Aurangabad,1975.

१०.Sardesai B. N., SocioEconomic and Cultural Life of Marathas, Phadake Publisher, Kolhapur, 2000.